# मुंबई विद्यापीठ

मसुदा
क्र.५/२०१८-१९

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

**मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०१८-१९ मधील**
**दि. ६ ऑक्टोबर २०१८ रोजी झालेल्या पाचव्या सभेचे सभावृत्त**

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०१८-१९ मधील पाचवी सभा शनिवार, ६ ऑक्टोबर, २०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता **सर फिरोजशहा मेहता, व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२** येथे आयोजित करण्यात आली. सभेमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | अध्यक्ष |
| २. | डॉ. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरू) | सदस्य |
| ३. | श्री. दिपककुमार मुकादम | सदस्य |
| ४. | डॉ. मुरलीधर कुऱ्हाडे | सदस्य |
| ५. | डॉ. (श्रीमती) रश्मी ओझा | सदस्य |
| ६. | प्रा. डॉ. गौतम गवळी | सदस्य |
| ७. | प्रा. डॉ. वैभव नरवडे | सदस्य |
| ८. | प्रा. डॉ. रविकांत सांगुर्डे | सदस्य |
| ९. | ॲड. निल हेळेकर | सदस्य |
| १०. | डॉ. सुभाष वाघमारे | सदस्य |
| ११. | श्री. प्रदीप सावंत | सदस्य |
| १२. | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य |
| १३. | डॉ. सुनिल भिरूड (प्र-कुलसचिव) | सदस्य सचिव |
| १४. | श्री. संजय शाह (प्र-वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित |
| १५. | डॉ. अर्जून घाटुळे (प्र-संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ ) | निमंत्रित |

९(१) डॉ. महादाप्पा मं. गोंडा - सदस्य

## ➢ अनुपस्थिती :-

सदर सभेस खालीस सदस्यांनी अनुपस्थित राहणार असल्याचे कळविल्याने त्यांची अनुपस्थिती मंजूर करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. अजय मुरलीधर भामरे | सदस्य |
| २. | प्रा. बि.एन. जगताप | सदस्य |

## ➢ स्वागत :-

प्र-कुलसचिवांनी स्वत:च्या तसेच विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे हार्दिक स्वागत केले.

## ➢ अभिनंदन :-

महाराष्ट्र सरकारने मुंबई विद्यापीठाची इनक्युबेशन व इनोवेशन सेंटर स्थापन करण्यासाठी निवड करून ५ कोटींचा निधी विद्यापीठास दिल्याबद्दल त्याचे सर्व श्रेय प्र-कुलगुरू व त्यांच्या सहकार्यांना जात असल्याने कुलगुरूंनी त्यांचे अभिनंदन केले.

*

व्यवस्थापन परिषदेतील सर्व सदस्यांनी इनक्युबेशन व इनोवेशन सेंटर विद्यापीठात स्थापन होत असल्याने कुलगुरू, प्र-कुलगुरू व त्यांच्या सहकार्यांचे अभिनंदन केले.

## ➢ श्रध्दांजली :-

**श्री. गणपतराव आंदळकर**

हिंदकेसरी श्री. गणपतराव आंदळकर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक १६ सप्टेंबर, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८६ वर्षांचे होते.

**श्री. दीना खटखटे**

अर्थतज्ज्ञ श्री. दीना खटखटे यांचे अल्पशा आजाराने दिनांक १७ सप्टेंबर, २०१८ रोजी निधन झाले.

**श्री. विष्णू खरे**

ज्येष्ठ कवी, पत्रकार आणि साक्षेपी अनुदवादक श्री. विष्णू खरे यांचे अल्पशा आजाराने दिनांक १९ सप्टेंबर, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७८ वर्षांचे होते.

**श्री. शांताराम पोटदुखे**

ज्येष्ठ कॉंग्रेस नेते तथा माजी केंद्रीय राज्यमंत्री श्री. शांताराम पोटदुखे यांचे दिर्घ आजाराने दिनांक २३ सप्टेंबर, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८६ वर्षांचे होते.



SKS

**श्रीमती. कल्पना लाझमी**

ज्येष्ठ दिग्दर्शिका श्रीमती कल्पना लाझमी यांचे कर्करोगाने दिनांक २३ सप्टेंबर, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६४ वर्षांच्या होत्या.

**श्रीमती. कविता महाजन**

आपल्या लेखनातून स्त्री अस्मितेचा हुंकार मांडणा-या आणि संवेदनशील ज्येष्ठ कवियत्री श्रीमती कविता महाजन यांचे अल्पशा आजाराने दिनांक २७ सप्टेंबर, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ५१ वर्षांच्या होत्या.

**श्री. त्यागराज पेंढारकर**

ज्येष्ठ छायाचित्रकार श्री. त्यागराज पेंढारकर यांचे वृध्दापकाळाने दिनांक २८ सप्टेंबर, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९३ वर्षांचे होते.

**पंडित. तुळशीदास बोरकर**

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे हार्मोनियमवादक 'पद्मश्री' पंडित तुळशीदास बोरकर यांचे वृध्दापकाळाने दिनांक २९ सप्टेंबर, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८४ वर्षांचे होते.

**श्रीमती. कृष्णा कपूर**

बॉलीवूडचे शोमॅन राज कपूर यांच्या पत्नी श्रीमती. कृष्णा कपूर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८७ वर्षांच्या होत्या.

वरील सर्व व्यक्तींच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करून दिवंगताना दोन मिनिटे उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब व ठराव |
|---|---|
| | (कार्यकारी प्राधिकरणे विभाग) |
| बाब क्र.१ | **दिनांक १० सप्टेंबर, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.** |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, दि. १० सप्टेंबर, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त खालील दुरूस्तीसह मान्य करण्यात आले :- |

| | |
|---|---|
| | १) पान क्र. ६ बाब क्र. १ मधील मुद्दा क्र तीन मधील दुसऱ्या ओळीमध्ये "Gorge" च्या ऐवजी "George" असे वाचावे.<br><br>२) पान क्र. ६ इतिवृत्तावरील चर्चेच्या अनुषंगाने पारित झालेल्या ठरावावरील मुद्दा क्र. १ "बिर्ला महाविद्यालयाचे नाव बदला संदर्भात No Dues Certificate २०११ पासून दिलेले आहे; तेव्हा बिर्ला महाविद्यालयाबाबत No Dues Certificate हे संलग्नता विभागाने महाविद्यालय स्थापन झालेल्या दिनांकापासून देण्यात यावे."<br><br>च्या ऐवजी<br><br>**"संलग्नता/वित्त व लेखा विभागाने बिर्ला महाविद्यालय स्थापन झालेल्या दिनांकापासून आजपर्यंत किती येणे (DUES) बाकी आहेत याची तसेच संलग्नता विभागाने महाविद्यालयाचे नाव बदल केले असल्यास त्याची माहिती पुढील व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत देण्यात यावी."**<br><br>३) पान क्र. ९ मधील खालील प्रथम परिच्छेद वगळण्यात यावा :-<br><br>"तसेच असाही ठराव करण्यात आला की, प्रशासकीय स्तरावर व्याख्यान कक्ष देण्याबाबत व्यावसायिक दराने भाडे निश्चित करण्यात यावे व त्यानुसार भाडे करार बनविण्यात यावा."<br><br>४) पान क्र.९ वरील बाब क्र. ६ मधील मुद्दा क्र. ४ मध्ये खालील वाक्याचा समावेश करण्यात यावा :-<br><br>**"नियुक्ती करताना प्रक्रिया राबविण्यात आली का?"**<br><br>५) पान क्र. १० बाब क्र. ७ च्या ठरावातील परिच्छेद क्र.२ "असाही ठराव करण्यात आला की, सर्व महाविद्यालये/ संस्थांमधून क्रिडा निधी जमा झाल्याची विद्यार्थी संख्यानिहाय माहिती सादर करण्यात यावी."<br><br>च्या ऐवजी दुरूस्तीसह खालील ठराव करण्यात आला. |

असा ठराव करण्यात आला की, सर्व महाविद्यालये/संस्थांच्या नावासह क्रिडा निधी जमा झाल्याची व ज्या महाविद्यालये/ संस्थांकडून क्रिडा निधी जमा न झाल्याची विद्यार्थी संख्यानिहाय रक्कमेची माहिती वित्त व लेखा विभागाकडून सादर करण्यात यावी.

६) पान क. ११ बाब क. १० परिच्छेद क. २ :- "चर्चेच्या अनुषंगाने असाही ठराव करण्यात आला की, निवडणुकीबाबत नविन कायद्यानुसार निवडणुक नोंदणी शुल्काची आकारणी केली नाही त्यामुळे विद्यापीठाचे झालेले आर्थिक नुकसान तसेच विविध अभ्यास मंडळाच्या निवडणुका घेण्यात आलेल्या अडचणी व या अनुषंगाने प्राप्त झालेली निवेदने याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदी व परिनियमाच्या अन्वये केलेल्या कार्यवाहीचा अभ्यास करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबतची डॉ. नरवडे यांनी केलेल्या मागणीची नोंद घेण्यात आली."

<u>च्या ऐवजी दुरूस्तीसह ठराव करण्यात आला.</u>

"चर्चेच्या अनुषंगाने असाही ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार पदवीधर नोंदणीसाठी नोंदणीशुल्क रूपये ४०/- न आकारल्यामुळे विद्यापीठाचे झालेल्या आर्थिक नुकसानीस जबाबदार कोण आहेत ते तपासावे तसेच निवडणूक प्रक्रियेबाबत प्रा. वैभव नरवडे यांचे निवेदन विविध संघटनांनी केलेली निवेदने/तक्रारींबाबत निवडणूक प्रक्रियेत कायद्याचे व परिनियमांचे नेमके कोठे उल्लंघन झाले आहे हे तपासण्यासाठी समिती गठित करण्यात यावी. समिती स्थापन करण्याचे अधिकार कुलगुरूंना प्रदान करण्यात आले."

७) पान क. १३ बाब क. १४ मधील ठरावावरील दुसऱ्या परिच्छेदामध्ये "श्री. प्रदीप सावंत यांनी डॉ. तुषार देसाई, रूपारेल महाविद्यालय यांचे नाव सुचविले" या वाक्याचा समावेश करण्यात यावा.

| | |
|---|---|
| | ८) पान क्र. १४ बाब क्र. १८ मधील, चौथ्या ओळीतील "सर्व प्रलंबित व" हे शब्द वगळण्यात यावे, तसेच ठरावामध्ये खालील परिच्छेदाचा समावेश करण्यात यावा.<br>"असाही ठराव करण्यात आला की, यू.जी.सी.चे नोटीफिकेशन लागू होण्याअगोदर विद्यापीठाकडे उपरोक्त विषयांवर ज्या काही प्रकरणांवर कार्यवाही सुरू झाली आहे; त्या प्रकरणांवर विद्यापीठ स्तरावर उचित कार्यवाही करण्यात यावी तसेच ज्या प्रकरणांवर कार्यवाही सुरू झालेली नाही त्या प्रकरणांवर यू.जी.सी. नोटिफिकेशन प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.<br><br>चर्चेच्या अनुषंगाने असाही ठराव करण्यात आला की, प्लॅगरिझमच्या किती केसेस विद्यापीठाकडे दाखल झाल्या आहेत याची माहिती देण्यात यावी."<br><br>९) पान क्र. १७ बाब क्र.२४, ठरावामधील ओळ क्र. ६ मध्ये Planning च्या ऐवजी "Planning/Geography" असे वाचावे.<br><br>१०) पान क्र. २० चर्चेच्या अनुषंगाने पारित झालेल्या मुद्दा क्र. २) मधील ओळ क्रमांक २ मध्ये "विषयानुसार सामाईक सेवा ज्येष्ठता" च्या ऐवजी तसेच "विषयाबाबत शिकविण्याच्या अनुभवानुसार" असे वाचावे.<br><br>इतिवृत्तावरील विविध विषयांवरील चर्चेच्या अनुषंगाने खालील ठराव पारित झाले :-<br><br>१) कुलसचिव, संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ व वित्त व लेखा अधिकारी ही विद्यापीठ प्रशासनातील अत्यंत महत्वाची पदे असल्याने सदर पदांची जाहिरात त्वरीत देण्यात यावी. त्याचप्रमाणे संचालक, विद्यार्थी विकास विभाग, संचालक, नवोपक्रम, नवोसंशोधन व सहाचार्य मंडळ, संचालक ज्ञानस्त्रोत केंद्र, संचालक क्रिडा व शारिरीक शिक्षण व विद्यापीठाच्या विनाअनुदानीत विभागांचे संचालक जसे की, आयडॉल, अल्केश दिनेश मोदी संस्था, गरवारे संस्था, थिएटर आर्टस् व अन्य संचालक पदांची जाहिरात देण्यात यावी.<br><br>२) मेसर्स जाधव ॲण्ड कंपनीच्या अहवालानुसार त्वरीत सर्व संबंधित महाविद्यालयांना संलग्नता शुल्काची मुळ रक्कम व |

| | | |
|---|---|---|
| | | दंडाची वसुली करण्याकरिता पत्र पाठविण्यात यावीत. महाविद्यालयाकडून मिळत असलेली रक्कम सर्व हक्क अबाधित ठेवून जमा करून घ्यावी. मेसर्स जाधव ॲण्ड कंपनीच्या अहवालानुसार महाविद्यालयांकडून थकबाकी रकमेबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास अशा तक्रारींचे निवारण करण्यासाठी समिती गठित करण्यात यावी.<br><br>समिती गठित करण्याचे अधिकार कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत महाविद्यालयांकडून याबाबत किती रक्कम जमा झाली याची माहिती देण्यात यावी. |
| | ३) | व्यवस्थापन परिषदेत विविध बाबींवर गठित झालेल्या समितीचे ठराव त्याच बैठकीत मंजूर करण्यात यावेत. |
| | ४) | प्रदीप सावंत यांनी सांगितले की, विद्यापीठाने रत्नागिरीत सब सेंटर करिता नऊ लाखाला जागा घेतली होती. तसेच रत्नागिरी सब-सेंटरचा काही भाग आपण कोस्टगार्डला देणार आहोत की दिली आहे; ती जागा कोस्टगार्डला दिली त्या बदल्यात अधिकचा एफ.एस.आय. मिळणार आहे काय याबाबत माहिती घेऊन व्यवस्थापन परिषदेमध्ये सादर करण्यात यावी. |
| | ५) | विद्यापीठातील तीन कर्मचारी डेंग्यूमुळे दगावल्याने त्यांच्या पाल्यांनी उपचारावर झालेला खर्च अदा करण्याच्या विनंतीबाबत, तसेच चर्चेच्या अनुषंगाने व्यवस्थापन परिषदेच्या १० सप्टेंबर, २०१८, बाब क्र. २७ विद्यापीठातील गटविमा योजनेत समाविष्ट न होणाऱ्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय भत्ता देण्याबाबत व गटविमायोजनेचे नुतनीकरण करण्याबाबत सविस्तर चर्चा झाल्यानंतर असा ठराव करण्यात आला की, गटविमा योजना नुतनीकरण करतांना कुटुंबाच्या व्याख्येमध्ये "आई-वडीलांचा देखील समावेश करण्यात यावा" मागील वर्षी विद्यापीठाने जेवढी रक्कम दिली होती त्या रक्कमे वरील रक्कम सर्व कर्मचा-यांच्या पगारातून कपात करण्यात यावी. खाजगी कंपनीकडून देखील निविदा मागविण्यात याव्यात. |

| | |
|---|---|
| | ६) बाब क्र. ४ "महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ मुंबई यांनी विद्यापीठ फोर्ट विभागामध्ये सायकाळी व्याख्यान घेण्यासाठी व्याख्यान कक्ष (Lecture Rooms) उपलब्ध करून देण्याबाबत गठित करण्यात आलेल्या समितीचा अहवाल" वरील चर्चेच्या अनुषंगाने असा ठराव करण्यात आला की, सदर जागेवर व्यावसायिक स्तरावर भाडे ठरविण्यासाठी स्वतंत्र बाब ठेवण्यात यावी.<br><br>७) बाब क्र. १० "विद्यापीठ अधिकार मंडळावरील निवडणुकांसाठी नियुक्त केलेल्या विद्यापीठातील/महाविद्यालयातील सेवकांना मानधन मंजूर करण्याबाबत." वरील ठरावावरील चर्चेच्या अनुषंगाने असाही ठराव करण्यात आला की, निवडणुकीच्या कामानिमित्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना मानधन देण्याची बाब पुनश्च: सादर करण्यात यावी.<br><br>८) बाब क्र. २८ "विद्वत परिषदेच्या दिनांक ८ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या सभेमध्ये केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ व मान्यतेसाठी सादर." वरील ठरावावरील चर्चेच्या अनुषंगाने असाही ठराव करण्यात आला की, विद्वत परिषदेच्या दिनांक ८ सप्टेंबर, २०१८ च्या बैठकीतील बाब क्र. ७.२ मध्ये सहायक प्राध्यापक (सायकोलॉजी) च्या पदाची सातत्यता ठेवण्यात येईल.<br><br>९) विद्यापीठाने महाविद्यालय/संस्थाना कोणतेही परवानगी पत्र देताना विद्यापीठाच्या सर्व संबधित विभागाकडून नो डयूज सर्टिफिकेटची तपासणी करूनच द्यावे.<br><br>१०) बाब क्र. ३० "विद्यापीठास प्राप्त झालेल्या अनेक तक्रारीनुसार डॉ. बी.एल जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समितीने दिलेला अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्याबाबत." या बाबी वरील ठरावावरील माहिती देताना कुलसचिवांनी सांगितले की सदर महाविद्यालयांना कारणे दाखवा नोटिस देऊन नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.<br><br>११) विद्यापीठातील/संलग्न महाविद्यालयातील उपलब्ध असलेल्या आर्थिक/मनुष्यबळाचा वापर कामकाजामध्ये गती आणण्याकरिता तसेच शिक्षक पदांच्या मान्यते संदर्भात शिक्षकांच्या "One Time Approval" बाबत केलेली सूचना |

| | |
|---|---|
| | तत्वत: मान्य करण्यात आली व सदर बाबीकरिता प्रभारी कुलसचिव यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. कुऱ्हाडे, डॉ. भामरे आणि प्रा. नरवडे यांची समिती नेमण्यात यावी.<br><br>१२) दि. २५ एप्रिल, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेत, बाब क्र ९ अन्वये झालेल्या ठरावानुसार तात्पुरत्या सुरक्षा रक्षकांना अद्याप गणवेश देण्यात आलेला नाही, तसेच त्यांना अतिरिक्त भत्ता अजूनही वाढीव दराने देण्यात येत नाही, याबाबत डॉ. वैभव नरवडे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.<br><br>त्या अनुषंगाने कुलगुरूंनी सभागृहास आश्वासित केले की, ठरावानुसार गणवेश देण्यात येईल आणि अतिरिक्त भत्ता देणेबाबत त्वरित योग्य तो निर्णय घेण्यात येईल.<br><br>१३) आयडॉलमध्ये मार्क वाढविण्याच्या प्रकरणात पोलीस स्टेशनला तक्रार केली असता काय झाले? तसेच कर्मचाऱ्याबाबत व इतरही सविस्तर माहिती देण्यात यावी. चौकशी समिती वगैरे नेमली आहे का? याबाबतची सविस्तर माहिती पुढील व्यवस्थापन परिषदेत सादर करण्यात यावी.<br><br>१४) कलिना परिसरातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत उपाययोजना व त्यांच्या अमंलबजावणीबाबत व्यवस्थापन परिषदेत सविस्तर माहिती देण्यात यावी. |
| | **(कार्यकारी प्राधिकरणे विभाग)** |
| बाब क्र.२ | **दिनांक ९ जुलै, २०१८ च्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावारील कार्यवाही अहवाल सादर.** |
| ठराव | सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत सविस्तर माहितीसह ठेवण्यात यावी. |
| | **(कार्यकारी प्राधिकरणे विभाग)** |
| बाब क्र.३ | **दिनांक १४ जुलै, २०१८ च्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावारील कार्यवाही अहवाल सादर.** |
| ठराव | सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत सविस्तर माहितीसह ठेवण्यात यावी. |

| | |
|---|---|
| | (आस्थापना विभाग) |
| बाब क्र.४ | प्रलंबित विभागीय चौकशी प्रकरणे पूर्ण करण्याकरता शासन पत्र संकिर्ण १६१९/प्र.क्र. ५३/११अ दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ मधील तरतुदीनुसार चौकशी अधिकारी यांची नेमणूक करण्याबाबत व सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -१०१४/प्र.क्र.५५/११-अ दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५ मधील तरतुदीनुसार चौकशी अधिकारी यांचा मानधन निश्चित करण्याबाबत शासननिर्णय व्यवस्थापन परिषदेपुढे स्विकृतीबाबत प्रस्ताव. |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, प्रलंबित विभागीय चौकशी प्रकरणाची वर्षनिहाय कर्मचाऱ्यांच्या नावाची यादी सादर करण्यात यावी व सविस्तर प्रस्ताव पुनश्च: व्यवस्थापन परिषदेमध्ये सादर करण्यात यावा. |
| | (सामान्य प्रशासन विभाग) |
| बाब क्र.५ | माळी कर्मचा-यांना दर तीन वर्षाऐवजी दर दोन वर्षांनी रेनकोट पुरविण्याबाबत. |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, माळी कर्मचा-यांना दर तीन वर्षाऐवजी दर दोन वर्षांनी रेनकोट पुरविण्याबाबतची बाब वित्त व लेखा समिती समोर ठेवण्यात यावी. |
| | (परीक्षा व मुल्यमापन मंडळ) |
| बाब क्र.६ | के.सी. विधी महाविद्यालयातील श्री. शाह नितेश राजेंद्र (आसन क्रमांक ८३३३९) या विद्यार्थ्यांचे विधी शाखेच्या द्वितीय वर्ष (सत्र-४) एप्रिल, २०१५ या परीक्षेचे गुण निकाल जाहिर झाल्यानंतर पाठविल्यामुळे महाविद्यालयाने सदर विद्यार्थ्याच्या निकालात सुधारणा करून निकाल जाहिर करण्याबाबतची तसेच महाविद्यालयावर दंडात्मक कारवाई करण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यात येत आहे. |
| ठराव | के.सी. विधी महाविद्यालयातील श्री. शाह नितेश राजेंद्र (आसन क्रमांक ८३३३९) या विद्यार्थ्यांचे विधी शाखेच्या द्वितीय वर्ष (सत्र-४) एप्रिल, २०१५ या परीक्षेचे गुण, निकाल जाहिर झाल्यानंतर पाठविल्यामुळे महाविद्यालयाने सदर विद्यार्थ्याच्या निकालात सुधारणा करून निकाल जाहिर करण्याबाबतची केलेली विनंती तसेच महाविद्यालयावर दंडात्मक कारवाई करणेबाबत परिक्षा व मुल्यमापन मंडळाने केलेल्या शिफारशीवर |

| | |
|---|---|
| | सखोल चर्चेनंतर असा ठराव करण्यात आला की, या प्रकरणी विद्यार्थ्यांची कोणतीही चूक नसल्याने विद्यार्थ्यांचे प्रॅक्टीकल ट्रेनिंग गुण विचारात घेऊन विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर करण्याबाबत परिक्षा व मुल्यमापन मंडळाने घेतलेल्या निर्णयाची नोंद घेण्यात आली.<br><br>पुढे असाही ठराव करण्यात आला की, रूपये ५,०००/- आणि रूपये ५०,०००/- दंड कमी करणेबाबत सन २०१६ ते २०१८ पर्यंत सदर प्रकरणाची संपुर्ण कागदपत्रांसह माहिती कालक्रमानुसार (cronology) व्यवस्थापन परिषदेत सादर करण्यात यावी. |
| | **(परीक्षा व मुल्यमापन मंडळ (शिष्यवृत्ती विभाग))** |
| बाब क्र.७ | **खैरूल इस्लाम हायर एज्युकेशन सोसायटीस्चे महाराष्ट्र महाविद्यालयांनी बी. एस्सी. या परीक्षेतील भौतिकशास्त्र या विषयात प्रथम येणा-या विद्यार्थ्यास/विद्यार्थीनीस "डॉ. रफीक झकारिया" यांच्या नावे सुवर्ण पदक देण्याबाबत सादर केलेला प्रस्ताव...** |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, खैरूल इस्लाम हायर एज्युकेशन सोसायटीसचे महाराष्ट्र महाविद्यालय यांनी बी. एस्सी. या परीक्षेतील भौतिकशास्त्र या विषयात प्रथम येणा-या विद्यार्थ्यास/विद्यार्थीनीस "डॉ. रफीक झकारिया" यांच्या नावे सुवर्ण पदक देण्याबाबत व रू. ५ ~~३~~,००,०००/- (रूपये ~~तीन~~ पाच लाख) रूपये देणगी म्हणून स्विकारण्यास मान्यता देण्यात आली.<br><br>*<br>तसेच चर्चेच्या अनुषंगाने असाही ठराव करण्यात आला की, विद्यापीठातर्फे किती सुवर्ण पदक व पुरस्कार विद्यार्थ्यांना दिले जातात त्याबद्दल वर्षनिहाय माहिती देण्यात यावी.<br><br>पुढे असाही ठराव करण्यात आला की, ज्या सुवर्ण पदाकांना सुरूवात होवून १० वर्षा पेक्षा जास्त कालावधी झालेला आहे, त्याचे पुनरावलोकन करण्यात यावे व त्यासाठी प्र-कुलगुरू व डॉ. रश्मी ओझा यांची समिती गठित करण्यात यावी. |
| | **(विद्याविषयक नियोजन व विकास विभाग (MSE-PP))** |
| बाब क्र.८ | **MOU signed between the Observer Research Foundation, Mumbai and Mumbai School of Economics & Public Policy (Autonomous ) for information and ratification.** |
| ठराव | It was resolved that MOU signed between the Observer Research |

| | |
|---|---|
| | Foundation, Mumbai and Mumbai School of Economics & Public Policy (Autonomous ) be ratified subject to inclusion of the clause in the MOU that their shall not be any financial liability on the University and Arbitration place should be Mumbai. |
| | (विद्याविषयक नियोजन व विकास विभाग) |
| बाब क्र.९ | **Proposal to establish chair in the memory "Justice M.L. Pendse." In "Environmental Law."** |
| ठराव | It was resolved that the proposal to establish chair in the memory of "Justice M.L. Pendse" in Environmental Law be accepted in principle and detailed proposal with the information of funds for establishing chair be submitted.<br><br>Further, it was resolved that the Pro-Vice-Chancellor and Dr. Rashmi Oza be authorized to discuss and finalized the duration and fund required for establishing the chair in the University.<br><br>It was also resolved that the information regarding number of Chairs in the University be submitted, by the Pro-vice-chancellor. |
| | (यु.सी.सी.विभाग) |
| बाब क्र.१० | **Increse of E-charge of Rs. 10/- per student in University share.** |
| ठराव | It was resolved that the information regarding amount received as e-charges and e-suvidha and the expenditure incurred from that amount be submitted to the Management Council. |
| | (क्षेत्र विकास विभाग) |
| बाब क्र.११ | **Fixation for Hotel and Rental fees for Madame Bhikaji Cama Hostel, Churchgate, Mumbai.** |
| ठराव | सदर बाबीवर सविस्तर चर्चा करण्यात आली व असा ठराव करण्यात आला की, प्रत्येक विद्यार्थीनीला रूपये १,२५,०००/- प्रती वर्षी लागू करण्याचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.<br><br>तसेच असा ही ठराव करण्यात आला की, प्रत्येक विद्यार्थीनीकडून वसतिगृहासाठी कमीत-कमी दर आकारण्यात यावा व यासाठी खालील |

| | |
|---|---|
| | बाबीचा विचार करण्यात यावा:-<br><br>१. विद्यापीठ फंडातून सबसिडी देण्यात यावी.<br><br>२. विविध शासकीय/अशासकीय संस्थाकडून अनुदान मिळण्याकरीता प्रयत्न करण्यात यावेत.<br><br>३. वसतिगृहाचा तळमजला बॅकेंस किंवा इतर संस्थाना भाडयाने देण्यात यावा.<br><br>४. जागा शिल्लक असल्यास मुंबई विद्यापीठा व्यतिरीक्त अन्य विद्यार्थीनी किंवा नोकरी करणा-या महिलांसही वाढीव दराने भाडे आकारून देण्यात यावे.<br><br>वरील गोष्टीचा आढावा घेण्यासाठी पुनरावलोकन समिती गठीत करण्यात यावी व सदर समिती गठीत करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना देण्यात आले. |
| | **(शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग(म.शि.))** |
| बाब क्र.१२ | **पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयातील सेवाज्येष्ठ शिक्षकांना प्राधिकृत करणेबाबतच्या वेगवेगळया गटांकडून प्राप्त तक्रारीबाबत.** |
| ठराव | The People's Education Society is established on 8th July, 1945 and running four Aided Colleges affiliated to the University of Mumbai. There is a dispute in the Management pending before the Charity Commissioner, Mumbai for years together and litigation is going on.<br><br>Therefore in the wider interest of the students, the State Government decided to appoint Incharge Principals and accordingly directed the Universtiy vide letter dated 24.4.2014. The said appointment was made as per seniority list of the respective colleges though the said appointment was for temporary period of six months, the same was continued from time to time.<br><br>On the basis of one letter dated 21.7.2018 under the Right to Information Act, 2005 and order of suspension dated 4.8.2018, the University took decision to appoint:<br><br>Dr. Garje in the place of Dr. Rao (Sidharth College of Arts, Science and Commerce) |

| | |
|---|---|
| | Ms. Sandhya Dhoke in place of Dr. Sudhakar Reddy (Sidharth College of Law).<br><br>The University of Mumbai vide letter dated 24.9.2018 addressed to the Charity Commissioner requested for names of the Trustees. The Charity Commissioner in his letter dated 29.9.2018 has clarified that the seven different Change Reports are sub-judice and therefore refused to make any comment on the names of the Trustees of the Peoples's Education Society.<br><br>Therefore, from the correspondence with the Charity Commissioner, it is clear that none of the trustees has any authority to take decision in respect of the day to day administration of the Colleges including appointment and suspension of the Principal without permission of the Charity Commissioner.<br><br>From the records, it is also clear that the matter is sub-judice and till the entire dispute is resolved, in the larger interest of the students, we need to abide by the directions of the Government of appointment of Incharge Principals on the basis of seniority.<br><br>The Management Council therefore **Resolved** to maintain Status-quo as on 11.6.2018. The subsequent orders of appointment of Incharge Principals are irregular and contrary to seniority list and therefore cannot sustain and continued. The said appointment order dated 27.8.2018 be withdrawn immediately and the earlier Incharge Prinipals may be reinstated. However, it is clarified that the salary and allowances (if any) enjoyed and withdrawn by the subsequent Incharge Principals may not be recovered. |
| | (आस्थापना विभाग) |
| बाब क्र.१३ | **To give promotion to higher post after retirement from a particular post to Shri S.T. More.** |
| बाब क्र.१४ | **Seniority issues both Shri S.N. Bagde and Shri A.P. Kolge.** |
| बाब क्र.१५ | श्री संजय बागले यांना, सहायक लेखापाल (वित्त व लेखा विभाग) पदावरून उपलेखापाल पदावर २०१५ पासून पदोन्नती देण्याबाबत. |
| ठराव | It was resolved that matter of item Nos. 13,14,15 be studied in detail at administrative level along with all such similar cases. Committee consisting of representative of administration, finance and legal adviser shall study these cases and suggest the appropriate action keeping in view the administrative, financial and legal implications. |
| | |

## (प्रबंध विभाग)

बाब क्र.१६ **Proposal received from the Principal Kokan Gyanpeeth, Rahul Dharkar College of Phyarmacy & Research Institute, Tal. Karjat. Dist- Raigad-410 201. For Closure for M. Pharm. Degree Course in the subject of Quality Assurance from the Academic Year 2017-18.**

ठराव It was resolved that the matter be deferred and placed before MC, after receiving a report of the Mukadam committee constituted to advice University on closure of course.

It was also resolved that the matter of closure of colleges/institutions, closure of coerces be placed before the Management Council after receiving the report of the Mukadam committee.

## (आस्थापना विभाग)

बाब क्र.१७ **To clarify the action taken in the matter of appointment of Shri Ghodke and the orders issued to Shri Tambe by bringing an end to his services in accordance to the Hon'ble High Court and Supreme Court orders.**

ठराव It was resolved that the matter be studied at administrative and legal level. If the issue is not resolved at administrative level the matter be placed before the Management Council.

## (आस्थापना विभाग)

बाब क्र.१८ **To create the post of Chief Executive Officer for the Incubation Centre at Kalina Campus.**

ठराव सखोल चर्चेनंतर असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २० नुसार नवोपक्रम, नवोसंशोधन व सहाचार्य मंडळाच्या अंतर्गत विद्यानगरी येथे नवसंशोधन केंद्र स्थापन करण्यात यावे स्टेट इन्वोशन सोसायटीतर्फे पत्र क्र. MSinS/२०१८/C-R/Inc/LoI अन्वये प्राप्त झालेले इरादापत्र (letter of Intent) व या केंद्रासाठी ५ कोटी रू. प्राप्त झाल्याची नोंद घेण्यात आली व प्र-कुलगुरूचे आभार व्यक्त करण्यात आले.

पुढे असाही ठराव करण्यात आला की, या केंद्रासाठी पुर्णवेळ काम करण्याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ८(२)(डी)(आय) नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी (Chief Executive Officer) हे पद कंत्राटी पध्दतीने हया सदर केंद्र सुरू असे

| | |
|---|---|
| | पर्यंतच्या अटींवर निर्माण करण्यात यावे. या पदासाठी अर्हता, अनुभव कर्तव्य, जबाबदाऱ्या, अधिकार व वेतन सोबतच्या परिशिष्ट "अ" प्रमाणे असतील. |
| | **(महिला विकास कक्ष विभाग (WDC))** |
| बाब क्र.१९ | **Ordinance on to Prevention, Prohibition and Regressal of Sexual Harassment and Prevention and Prohibition of Gender Discrimination of Women Employees and Student.** |
| ठराव | It was resolved that a committee consisting of Adv. Shri. Neel Helekar (Convener), Dr. Rashmi Oza and Shri Pradeep Sawant be constituted to finalize the Ordinance.<br><br>It was also resolved that the Ordinance on Prevention, Prohibition and Redressal of Sexual Harassment and Prevention and Prohibition of Gender Discrimination of Women Employees and Student be approved subject to corrections and modifications suggested by the Helekar committee and the same may be placed before the Management Council for information and ratification. |
| | **(शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग (वि.शि.))** |
| बाब क्र.२० | **डॉ. जोस जॉर्ज यांना विद्यापीठ फंडातून देण्यात आलेल्या दोन वर्षांच्या वेतनाबाबत मा. प्र-कुलगुरू यांच्या एक सदस्यीय समितीच्या दिनांक ११ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या संपन्न झालेल्या बैठकीचा अहवाल.** |
| ठराव | डॉ. जोस जॉर्ज यांना ६० वर्ष पुर्ण झाल्यावर विद्यापीठ फंडातून देण्यात आलेल्या दोन वर्षांच्या वेतनाबाबत याचिका क्र. ११०२७/२०१६, मा. उच्च न्यायालयाने दिलेले आदेश, शासनाने याप्रकरणी निर्गमित केलेले आदेश तसेच मा. प्र-कुलगुरू यांच्या एक सदस्यीय समितीने केलेल्या शिफारशी आणि अन्य कागदपत्र विचारात घेता सखोल चर्चेनंतर असा ठराव करण्यात आला की, डॉ. जोस जॉर्ज यांना विद्यापीठ फंडातून देण्यात आलेल्या वेतनाची वसुली करण्यात यावी. तथापी डॉ. रविंद्र सांगुर्डे यांनी डॉ. जोस जॉर्ज यांच्या वेतन वसूलीस नापसंती दर्शवली. श्री. दिपककुमार मुकादम, ॲड. निल हेळेकर, ~~डॉ. गौतम गवळी~~ यांनी डॉ. जोस यांच्याकडून माननिय कोर्टाच्या आदेशानूसार वेतनाची वसूली करण्यात यावी, असे स्पष्ट केले.<br><br>चर्चेअंती असाही ठराव करण्यात आला की, डॉ. जोस जॉर्ज यांना विद्यापीठ फंडातून देण्यात आलेल्या दोन वर्षाच्या वेतनाची संपूर्ण वसुली |

| | |
|---|---|
| | करण्यात यावी, (तसेच वसुली झाल्यानंतर सेवा निवृत्ती वेतनाची प्रक्रिया त्वरित सुरू करण्यात यावी. डॉ. जोस जॉर्ज यांनी विद्यापीठात निवृतीनंतर केलेली सेवा विचारात घेता त्यांना त्याची विद्यापीठाच्या नियमानुसार योग्य ती भरपाई देण्यात यावी.) |

*

## आयत्यावेळी आलेले विषय

**आयत्या वेळेचे आलेल्या विषयांवर सविस्तर चर्चा झाली व त्या अनुषंगाने खालील प्रमाणे ठराव पारित झाले :-**

१) विद्यापीठ सेवेतून निवृत्त झाल्यानंतर जे कर्मचारी/शिक्षक विद्यापीठ वसाहतीमध्ये रहात असतील त्यांना त्वरीत विद्यापीठातील जागा रिक्त करण्यास सांगावे. तसेच त्यांच्याकडून नियमाप्रमाणे भाडे आकारण्यात यावे. सेवेतून निवृत्त होवून विद्यापीठात राहत असलेल्या कर्मचारी/शिक्षकांची यादी व त्यांच्या घर भाडयाची थकबाकी व्यवस्थापन परिषदेत सादर करावी.

२) तृतीय वर्ष कला शाखेच्या अभ्यासक्रमात श्री. दिनकर मनवर या लेखकाचे 'दृश्य' व 'दृश्यात' हे पुस्तक निश्चित करण्यात आले होते. परंतु सदर पुस्तकातील 'पाणी कस असत' या कवितेत आदिवासी मुलीबद्दल आक्षेपार्ह ओळी असल्याने ते पुस्तक अभ्यासक्रमातून वगळण्याबाबत काही संघटनानी मागणी केली होती. याबाबत संबंधित अभ्यास मंडळ व अधिष्ठाता यांनी शिफारस केल्याप्रमाणे संबंधित कविता त्वरित वगळण्यात आल्याचे कुलगुरूंनी सांगितले. सदर बाब अभ्यास मंडळ (बोर्ड ऑफ स्टडीज्) च्या बैठकीत उचित कार्यवाहीसाठी ठेवण्यात यावी.

३) उत्तर पत्रिकेवर विद्यार्थ्यांचे नाव छापण्यात आल्याबाबत वृत्तपत्रात आलेल्या बातमीविषयी सभागृहाला अधिकची माहिती देण्याची मागणी सदस्यांनी केली. उत्तर पत्रिकेवर विद्यार्थ्यांचे नाव छापण्याआधी परिक्षा व मुल्यमापन मंडळाची मान्यता घेण्यात आली होती काय? असा प्रश्न डॉ. वैभव नरवडे यांनी उपस्थित केला. याबाबत खुलासा करताना संचालक परिक्षा व मुल्यमापन मंडळ यांनी सांगितले की, परिक्षा व मुल्यमापन मंडळाची परवानगी घेऊनच निर्णय घेण्यात आला आहे. श्री. प्रदिप सावंत यांनी याबाबत तीव्र आक्षेप नोंदवीत प्रश्न उपस्थित केला की, संचालकांच्या दृष्टीकोनातून शिक्षकांना विद्यार्थ्यांचे नाव दिसणार नाही. परंतु शिक्षकांव्यतिरिक्त अनेक घटक उत्तर पत्रिका हाताळत असल्याने केवळ शिक्षकच गैरप्रकार करतात म्हणून त्यांना विद्यार्थ्यांचे नाव दिसणार नाही, हा संचालकांचा खुलासा

आक्षेपार्ह असल्याचे श्री. सावंत यांनी सांगितले. अनेक विद्यार्थी आसन क्र. चुकीचा टाकतात त्यामुळे उत्तरपत्रिकेत नावाचा उल्लेख असल्यास २०१७ सारखी परिस्थिती निर्माण होणार नाही या संचालकाच्या मताबाबत श्री. सावंत म्हणाले की, २०१७ मध्ये निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीत ६००० ते ७००० विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका सापडत नव्हत्या. परंतु त्यानंतर विविध तांत्रिक उपाययोजना केल्यावर त्यानंतरच्या परिक्षेत ही संख्या तीनशे पर्यंत आली व पुन्हा काही उपाययोजना केल्यास ही संख्या आणखी कमी होऊ शकते. एक ते दोन वर्षात या परिस्थितीवर पुर्णपणे मात करता येवू शकते, असे श्री. सावंत म्हणाले. अशाच प्रकारचे मत श्री. दिपककुमार मुकादम यांनी मांडले व कोणत्याही परिस्थितीत तीनशे विद्यार्थ्यांसाठी २७,०००,०० उत्तरपत्रिकांवर नाव छापणे संयुक्तिक नाही, असे ते म्हणाले.

याबाबत सभागृहाने तीव्र आक्षेप नोंदवला व कुलगुरूंना निवेदन करण्याची विनंती केली. कुलगुरूंनी सांगितले की, कोणताही निर्णय घेतांना त्याबद्दल काही कारणमिमांसा असते. उत्तरपत्रिकांवर विद्यार्थ्यांचे नाव छापण्याचा निर्णय परिक्षा व मुल्यमापन मंडळामध्ये झाल्याचे डॉ. अर्जुन घाटूळे यांनी स्पष्ट केले असल्याने याबाबत नेमका निर्णय काय झाला त्याबाबत संचालकांनी कुलगुरूंसोबत बसून त्याची पडताळणी करण्यात येईल व निर्णय अत्यंत महत्वाचा असल्याने याबाबत इतर तज्ञांची मते घेवून पुन्हा परिक्षा व मुल्यमापन मंडळात चर्चा करण्यात येईल.

परिक्षा व मुल्यमापन मंडळाच्या सदस्यांची त्वरित संपर्क साधून त्वरित मंडळाची बैठक आयोजित करण्यात येईल व याविषयावर तातडीने योग्य तो निर्णय घेण्यात येईल. परिक्षा पध्दती ही अत्यंत संवेदनशील बाब असल्याने कोणत्याही घटकांच्या मनात संशय निर्माण होणार नाही व विद्यापीठाच्या निर्णयामुळे लोकांच्या मनात चुकीचा संदेश जाणार नाही, यांची पुरेपुर काळजी घेण्यात येईल, असे कुलगुरूंनी सांगितले.

४) सी.एच.एम. महाविद्यालय, उल्हासनगर येथील प्लॅगरिझम प्रकरणी प्राचार्य आणि व्यवस्थापनाने विद्यापीठाच्या सुचनेनंतर अद्याप कुठलीही कार्यवाही केली नसल्याचे डॉ. वैभव नरवडे यांनी निर्देशनास आणले असता, विद्यापीठामार्फत संबंधित पोलीस स्टेशनमध्ये लवकरात लवकर तक्रार दाखल करण्यात येईल, असे प्रभारी कुलसचिवांनी स्पष्ट केले.

५) डॉ. वैभव नरवडे यानी सी.एच.एम महाविद्यालयातील निवृत्त प्राचार्य मॅथ्यू यांच्या पेंशनबाबत प्रश्न उपस्थित केला व

याबाबत खालीलप्रमाणे निवेदन केले.

"प्रा. मॅथ्यू यांचेबाबत एका महिला शिक्षकेने महिला विकास कक्षाकडे तक्रार दाखल केली होती. महिला विकास कक्षाने महाविद्यालयाकडे शिफारशींसह अहवाल पाठवला. त्यानुसार प्रा. मॅथ्यू यांना शिक्षा ठोठावण्यात आली. प्रा. मॅथ्यू यांनी माहितीचा अधिकार अंतर्गत माहिती मागितली असता माहिती देण्यात आली नाही. अर्जदाराने याबाबत प्रथम अपिल केले असता अर्जदारास माहिती देण्यात आली नाही. त्यानंतर अर्जदाराने राज्य माहिती आयोगाकडे दुसरे आपिल केले व आयोगाने माहिती देणेबाबत महिला विकास कक्षाला आदेश दिले परंतु महिला विकास कक्षाने राज्य माहिती आयोगाच्या आदेशाची दखल न घेतल्याने आयोगाने संबंधितांची विभागीय चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. सदरची चौकशी पूर्ण करावी व त्याची माहिती देण्यात यावी.

डॉ. नरवडे यांनी व्यवस्थापन परिषदेच्या निर्दशनास एक गंभीर बाब आणली की, महिला विकास कक्षाच्या तत्कालिन अध्यक्षांचा कार्यकाळ दि. २५/१०/२०१६ रोजी संपला असताना त्यांनी प्रा. मॅथ्यू यांचेबाबत सहसंचालकांना दि. १५/१२/२०१६ रोजी कोणत्या अधिकारात पत्र पाठवले त्याचा खुलासा प्रशासनाने करावा."

श्री. दिपककुमार मुकादम म्हणाले की, सबंधित अध्यक्षांचा कालावधी संपल्यानंतर सहसंचालकांना त्यांनी पत्र कसे काय पाठविले? ही बाब अत्यंत गंभीर असून त्यांनी पदाचा गैरवापर केला असल्याने याबाबत चौकशी करण्यात यावी अशी मागणी केली. याबाबत चौकशी समिती गठीत करण्यात यावी, असा ठराव करण्यात आला व समिती गठीत करण्याचे अधिकार कुलगुरूंना प्रदान करण्यात आले.

याबाबत कुलसचिवांनी सांगितले की, प्रा. मॅथ्यू यांचे पेंशनबाबत त्वरीत सहसंचालकांकडे पत्रव्यवहार करण्यात येईल. राज्य माहिती आयोगाने दिलेल्या माहितीनुसार संबंधितांची विभागीय चौकशी करण्यात येईल.

६) डॉ. वैभव नरवडे यांनी सी.एच.एम. महाविद्यालय, एच.आर. महाविद्यालय, के.सी.महाविद्यालय, नारी गुरसाहनी विधी महाविद्यालय, सोनवणे महाविद्यालय, एम.सी.सी.महाविद्यालय या सर्व महाविद्यालयात प्रभारी प्राचार्य आहेत असे निर्दशनास आणले. या सर्व महाविद्यालयांना प्राचार्यांची पदे त्वरित भरण्याकरिता कार्यवाही सुरू करण्याची सूचना विद्यापीठातर्फे देण्यात यावी, असे ठरले.

तसेच इतर महाविद्यालयात जेथे प्रभारी प्राचार्य आहेत, त्या महाविद्यालयांना सुध्दा कायमस्वरूपी प्राचार्य भरण्याची प्रक्रिया सुरू करण्याची सूचना देण्यात यावी.

७) डॉ. वैभव नरवडे यांनी विद्यापीठाच्या विनाअनुदानित विभागात एक/दोन प्राध्यापक आहेत. तसेच कायमस्वरूपी प्राध्यापक भरती होईपर्यंत त्या प्राध्यापकांची पुर्ननियुक्ती करून त्यांना तात्पुरती मुदत वाढ देण्यात यावी, अशी मागणी केली. त्या अनुषंगाने नियमानुसार भरती होईपर्यंत जे प्राध्यापक कार्यरत आहेत, त्यांना ठरावीक कालावधीसाठी (on contract) पुर्ननियुक्ती देण्यात यावी, असे ठरले.

८) राष्ट्रीय/राज्यस्तरीय स्तरावरील सांस्कृतिक, क्रिडा, एन.एस.एस. आणि एन.सी.सी. मध्ये भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना परिक्षेस बसता न आल्यास त्यांची परिक्षा घेणेबाबत विद्यापीठाने परिपत्रक निर्गमित करावे अशी मागणी सदस्यांनी केली असता ती मान्य करण्यात आली.

कुलगुरू | प्र कुलगुरू | कुलसचिव

SKS



* सदर इतिवृत्तास दि २८ नोव्हेंबर २०१८ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत दुरुस्ती करण्यात आलेली आहे.
SKS

Enclosure to item No.1

परिशिष्ट-अ

बाब क्र. १८

| | |
|---|---|
| | **Role of Incubation CEO**<br><br>**The CEO of UoM –IIC will be responsible for**<br><br>**Vision :** Fine tune the vision out of broad vision for the incubator. The incubator manager can then later detailout the objectives and goals in alignment with the vision of the incubator.<br><br>**Infrastructure :** Co-ordinate and maintain infrastructure. Keep a track of the need and availability of infrastructure for the incubator. An incubator may decide on whether it wants to provide physical or virtual incubation at a later stage.<br><br>**Funding:** Estimate the basic fund requirement for the next two years and ensure that the incubator has initial funding to start with. University and Government of Maharashtra will provide the initial funding for registration of the incubator, hiring the incubation CEO and manager, infrastructural facilities, starting operations and maintaining a minimum capital in hand. |

**Governance:** CEO will get clarity for Governance purpose as the Governance Board and Execution / Implementation team would be separate. The incubator will be registered as a separate legal entity. While the Board performs the advisory role and will help the incubator CEO to build strategies; the executive functions will be performed by the incubator manager and the team hired for running the operations of the incubator.

**Creation of complete ecosystem** of support including mentoring, IPR, Accounting, Compliance, legal, technology and other related issue.

**Advertisement**

**Name of the Position:** *Chief Executive Officer (CEO)*

*A person who is having network in the field, energetic, motivator, looking for challenges and has entrepreneurial drive should apply*

**Salary and Terms of engagement:** The salary will be Rs. 1,00,000/- (consolidated) per month. The initial period of appointment will be for 3 years on contractual basis extendable on mutual consent. Contract can be terminated with 3 months notice on either side. Performance based incentives will be considered in deserving cases.

**Qualifications & experience:** The candidate must hold Engineering Degree and Master degree in Management or its equivalent from a recognized Institution. He/she should be a seasoned Techno-Commercial person. The management experience in industry or in the public sector would be an added advantage. He/she must have a minimum of 5 years of experience at a senior level in the management of incubators or must have first-hand experience in establishing and running the Innovation/ incubation Centre. He/she must have previous experience of leading and mentoring successful incubation centre OR leading an entrepreneurial and ambitious organization with demonstrable success'.
The role requires knowledge of Finance & experience in Investing, full awareness of the technology market space and current and future trends.

It is desirable that he/she have/had invested in projects as Angle Investor/ Venture Capitalist

**Roles and Responsibilities:** The key responsibilities of the *Chief Executive Officer (CEO)*will be (i) to establish Incubator at University of Mumbai (ii) to manage the same in a sustainable and growth-oriented manner in terms of increasing the profile, diversity and competence of incubated start-up ventures.

Further, as CEO, he/she will be responsible :

1. for the day-to-day operations of the incubator
2. attracting funds through Grants and other means,
3. administering the earnings and expenses related to the operations and expansion of the Centre under the directions of the Board of Directors of the UoM-IIC
4. complying with all regulatory requirements,
5. Making strategic decisions to steer the Centre towards becoming a world-class Centre for nurturing start-ups in operational areas related to (but not limited to) Biotechnology, Nanotechnology, Devices, and Information Technology.

The CEO should be able to leverage the strategic location of the UoM-IIC for nucleating an ecosystem of innovation within the Institute and the region.
He/she will be expected to work closely with the students and faculty University of Mumbai to help them steer technologies/IPs towards commercialization, by mentoring them and helping them to set up start-up ventures and also helping to raise these to 'venture-capital ready' states.
He/she also should be able to create institutional means of venture creation to broaden the pipeline of Innovations at University of Mumbai- IIC to create value for the University and the society at large